# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे-ऑगस्ट २००८ वर्ष १ अंक १ पृष्ठे ८ रु. २/-

## जे. कृष्णमूर्ती

जे. कृष्णमूर्ती यांचा जन्म ११ मे १८९५ रोजी आंध्रप्रदेशातील मदनपल्ली येथे झाला. लहानपणापासूनच विरक्त वृत्ती असलेला हा मातृभक्त सात्त्विक मुलगा वयाच्या १५ व्या वर्षी थिऑसॉफिकल सोसायटीकडून 'जगद्‌गुरू' होण्यासाठी निवडला गेला.

अनेक स्थित्यंतरे पार करीत जगद्‌गुरूपद नाकारून, कृष्णजींनी मानवाला बंधमुक्त करण्याची प्रतिज्ञा केली. तो दिवस होता- २ ऑगस्ट १९२९. त्यानंतर त्यांना गवसलेले 'सत्य' सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी विश्वभ्रमण करत त्यांनी भाषणे - संवाद या माध्यमातून लोकांना जागे करण्याचा प्रयत्न केला. ''सत्य ही पथहीन भूमी आहे'' (''Truth is a Pathless land''), कोणत्याही मानवनिर्मित धर्मामधून, पंथामधून मानवाला सत्याप्रत जाता येणार नाही. सत्य हे तुमच्यापाशीच आहे. त्याचा शोध तुम्हालाच स्वत:ला घ्यावा लागेल. कोणताही गुरू तुम्हाला मुक्त करू शकणार नाही''- हे सत्य ते लोकांना अखेरच्या श्वासापर्यंत सांगत राहिले.

जे. कृष्णमूर्ती १७ फेब्रुवारी १९८६ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी अमेरिकेतील ओहाय येथे अनंतात विलीन झाले.

## संपादकीय

**'अंतरलहरी'** चा हा पहिला अंक प्रकाशित करताना कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई या संस्थेला अतिशय समाधान वाटत आहे. आम्ही हाती घेतलेल्या उपक्रमाचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. आधुनिक काळातील एक मूलगामी विचारवंत जे. कृष्णमूर्ती यांचे विचार या पत्रिकेद्वारे लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा मानस आहे.

'आत्मज्ञान' हा कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचा गाभा आहे. ज्यांना मानवाच्या हिताची आस होती अशा बऱ्याच विचारवंतांनी माणसाला स्वत:चा शोध घ्यायला सांगितले. ''मानवाचे दु:ख, नातेसंबंधातील भांडणे, आंतरिक संघर्ष आणि हिंसा या सर्वांचा उगम कशात आहे याचा शोध घेणे म्हणजेच आत्मज्ञान आणि हे ज्ञान आपल्याला दैनंदिन जीवनातूनच प्रतीत होत असते.'' आत्मज्ञानाचा हा अर्थ इतक्या तर्कशुद्ध पद्धतीने आणि धारदारपणे विशद करणारे जे. कृष्णमूर्ती हे बहुधा एकमेव विचारवंत असावेत. कोणतीही खोटी आशा न दाखवता, माणसाला खडबडून जागे होऊन, सर्वशक्तिनुसार स्वत:च्या अंतरंगात ते डोकावयाला सांगतात. अशा आंतरिक अवलोकनामुळेच बाह्यव्यवस्थेचा तोल सांभाळला जाईल असे त्यांचे म्हणणे आहे. जगाची गंभीर स्थिती, युद्ध, लाचखोरी, आतंकवाद, गरिबी, दु:ख, पर्यावरणाची नासधूस, शक्तिशाली माणसांकडून इतरांचा आणि निसर्गाचा अमानुष वापर या भयावह गोष्टींचा चित्रपट सोप्या शब्दात परंतु अतिशय तळमळीने कृष्णजी आपल्यापुढे उभा करतात. या सर्व गोष्टींचा उगम आपल्या अंतरंगात आहे हे समजून घेऊन, आंतरिक परिवर्तन घडण्याची कशी गरज आहे, हेच कृष्णजी आर्ततेने सांगत राहिले. यासाठी ५०-६० वर्षे लोकांशी संवाद साधत राहिले. माणसावरील प्रेमामुळे बोलले.

कृष्णजींना अभिप्रेत असलेले हे परिवर्तन घडवून आणण्याची ऊर्जा प्रेमातच आहे. परंतु त्या सर्वस्पर्शी, सर्वव्यापी, दिव्य प्रेमासाठी आत्मज्ञानाकडे, एखाद्या धर्मातील अंधश्रद्धा घेऊन नव्हे, तर आपल्या अंतरंगात, प्रत्यक्ष आपले मन काय करते ते कृष्णजी पाहायला सांगतात. हा एक अत्यंत प्रभावशाली प्रकाश आहे, फक्त डोळेझाक नसली तर तो सर्वांसाठी आहे. सामान्य माणसासाठी तो सूर्यप्रकाशासारखा तेजस्वी आहे. कृष्णजींची शिकवण सुगंध घेऊन येणाऱ्या मंद वाऱ्यासारखी सुखद आहे, बंधनातून मुक्त करण्याइतकी प्रभावशाली आहे, परिवर्तन आणण्याइतकी समर्थ आहे. एकदा या शिकवणीतील गाभ्याचा सुगावा लागला की ती शिकवण तुम्हाला खिळवून ठेवते. इथे भ्रम नाही, स्वप्न नाहीत, औदासिन्य नाही, फक्त उघड सत्य आहे आणि कृष्णजी म्हणतात, ''त्या वास्तवाबरोबर राहू शकणे हा एकच मुक्तीचा मार्ग आहे आणि आत्मज्ञानात त्याचा उलगडा आहे, त्यात परिवर्तन आहे.''

हे खूप आदर्शवादी वाटले तरी ते वास्तव आहे, कठीण असले तरी अशक्य नाही. हे थोड्या सन्माननीय व्यक्तींसाठी नाही, ते तुमच्या आमच्यासारख्या माणसांसाठी आहे, ते सर्वसमावेशक आहे. आपल्याला हे कठीण वाटते कारण माणूस आज चुकीचे वळण घेऊन

भलत्याच दिशेने खूप पुढे गेला आहे. पण अजूनही दिशा बदलता येईल, सोयीची वाट असली तरी ती चुकीची असेल तर पुढे जाण्यात काय अर्थ आहे? इथे एका सुफी संताच्या गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो;

एका रात्री नसिरुद्दीन रस्त्यावरच्या दिव्याखाली काही शोधत होता. एका वाटसरूने ते पाहिले आणि त्याला विचारले - ''काय हरवलंय?''

नसिर : किल्ली

वाटसरू : कुठे हरवली?

नसिर : त्या तिथे, अंधारात...

वाटसरू : मग इथे का शोधतोस?

नसिर : कारण इथे उजेड आहे म्हणून...

अनेक संतांनी, विचारवंतांनी दाखवलेला खरा मार्ग सोडून, आपण सोयीच्या सोप्या वाटेने जातो. मार्ग सोपा की कठीण हा प्रश्न नाही, मार्ग चुकीचा की बरोबर ही मुद्याची गोष्ट आहे.

कृष्णजी म्हणतात, ''जी व्यक्ती स्वत:ला समजून घेते तिच्या मनातच प्रेम, प्रज्ञा, सर्जनशीलता उद्‌भवू शकते. समाजस्वास्थासाठी असाधारण प्रेमाला पर्याय नाही. सर्व माणसांबद्दल संपूर्ण जबाबदारीची भावना असणे म्हणजेच 'प्रेम' असे आपण निश्चितपणे, ठामपणे म्हणू शकतो. असे प्रेमच समाजाच्या वर्तमान स्थितीत परिवर्तन आणू शकेल.

हे प्रेम कुठून येणार? आपण ज्याला प्रेम म्हणतो, त्यापेक्षा कृष्णजींची प्रेमाची व्याख्या अगदी वेगळी आहे. त्यांच्या मते प्रेम ही परिवर्तित मनाची परिणती आहे. अशा मनात संस्कारांना जागा नाही. हे रिक्त मन नव्याला समजून घेण्यासाठी ताजेतवाने असते, त्यावर जुन्याचा, भूतकाळाचा प्रभाव नसतो.

अंतरलहरीच्या या पहिल्या अंकातून कृष्णजींना अभिप्रेत असलेल्या मूलगामी अशा परिवर्तन-प्रक्रियेचाच शोध आपण घेणार आहोत. त्याचे अपरोक्ष अंदाज घेण्यापेक्षा 'परिवर्तन म्हणजे काय' हे कृष्णजींच्याच शब्दांमध्ये समजून घेऊया !

## परिवर्तन अशी काही गोष्ट आहे का? परिवर्तन होणे म्हणजे काय असते?

ज्यावेळी तुम्ही निरीक्षण करीत असता, रस्त्यावरचा कचरा, धूळ पाहता, राजकीय नेते कसे वागतात ते पाहता, तुमच्या पत्नीशी व मुलांशी तुमची वागणूक कशी असते तीही नीट अवलोकन करता इ. इ., त्यावेळी तिथे परिवर्तन होत असते. तुम्हाला समजते का हे? आपल्या दैनंदिन जीवनात एक प्रकारची सुव्यवस्था आणणे हे परिवर्तनच असते, परिवर्तन म्हणजे या जगाच्या पलिकडचे, आगळेवेगळे काही असते असे नाही. जेव्हा आपण स्पष्टपणे, वस्तुनिष्ठपणे, संयुक्तिकपणे विचार करीत नसतो, तेव्हा अवधान द्या, ते लक्षात घ्या आणि तात्काळ सोडून द्या, ती सवय टाकून द्या, हे परिवर्तनच असते. तुमच्या मनात मत्सर आला तर त्याचे अवधान ठेवा, त्याकडे नीट पहा. त्याला वाढायला, विकास व्हायला अवसरच देऊ नका. ताबडतोब ते बदला. तेच परिवर्तन. जेव्हा तुम्ही लोभी असता, हिंसक, महत्त्वाकांक्षी, कोणीतरी संत-महंत होण्याचा प्रयत्न करीत असाल तर त्यामुळे एक अगदी कुचकामी जग कसे निर्माण होते ते बघा. तुम्ही याविषयी जागरूक आहात की नाही हे मला माहीत नाही. स्पर्धा ही जगाचा नाश करीत आहे. जग जास्त जास्त चढाओढीने भयंकर आक्रमक होत आहे आणि ही वृत्ती जर तुम्ही तात्काळ टाकून दिलीत तर तेच परिवर्तन होय. जास्त खोल शोध घेतलात तर हे स्पष्ट होईल की विचार प्रेमाला नाकारतो. म्हणून आपण एक गोष्ट शोधून पहायलाच हवी, ती म्हणजे विचार अंत पावेल का? काळाचा अंत होईल का? त्याचे तत्त्वज्ञान बनवून त्यावर चर्चा करीत बसायचे नाही, तर शोधून पहायचे. तेच खरोखर परिवर्तन होय. आणि या प्रश्नात तुम्ही जर जास्त गहन स्तरावर जाल तर असे दिसून येईल की, कोणीतरी होण्याचा, तुलना करण्याचा विचार हे परिवर्तन नव्हे. आपण म्हणजे कोणीच नाही, अशी अवस्था, हेच परिवर्तन.

मिटींग लाईफ
'समाजाविरुद्ध उभे राहणे'
संवाद, मद्रास १९८१

## सह्याद्री अध्ययन केंद्रासंबंधी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या विद्यमाने चालू केलेल्या सह्याद्री स्कूलच्या परिसरात सह्याद्री अध्ययन केंद्र हे कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या अभ्यासकांसाठी १९९८ साली प्रस्थापित केले गेले आहे. हे अभ्यास केंद्र पुणे शहरापासून ६० कि.मि. दूर राजगुरुनगरजवळ तिवई हिलवर अत्यंत निसर्गरम्य जागी आहे. सभोवती सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि खाली दरीतून भीमा नदी वाहते.

इथे येऊन शांतपणे राहून स्वत:चा शोध घेऊ इच्छिणाऱ्या अभ्यासकांसाठी एक अध्ययन कक्ष असून येथे कृष्णजींची व इतरही अनेक पुस्तके आणि डिव्हिडीज् उपलब्ध आहेत. येथे राहण्या जेवण्याची सोय आहे. महिन्यातून एकदा ५ ते ७ दिवसांच्या विशेष अध्ययन कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

संपर्कासाठी पत्ता - संचालक, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री, पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा- पुणे, पिन-४१०५१३, महाराष्ट्र
फोन : (०२१३५)२८८७७२, २८८३४८, २८४३४६
ई-मेल: kscskfi@gmail.com वेबसाईट : http://www.kscskfi.com

# परिवर्तन म्हणजे काय?

**आमूलाग्र** क्रांती होणे अत्यंत निकडीचे आहे हे तर उघड आहे. जगातील बिकट परिस्थितीची ती गरज आहे. आपल्या जीवनाची ती गरज आहे. आपल्या जीवनातील रोजचे प्रसंग, रोजचे व्यवहार आणि काळज्या यांची ती गरज आहे. आपल्या समोरील समस्यांचीही ती गरज आहे. आपल्या भोवतीचे सर्व काही कोसळत आहे. म्हणून पायाभूत, आमूलाग्र क्रांती अत्यंत आवश्यक आहे. वरवर पाहता जरी जगात सुव्यवस्था दिसली तरी वस्तुत: सर्व काही आतून पोखरून हळूहळू नष्ट होत आहे. विनाशाची प्रचंड लाट जीवनाच्या लाटेला खाऊन टाकीत आहे.

म्हणून क्रांती फार आवश्यक आहे. पण ती क्रांती एखाद्या कल्पनेवर आधारली असता कामा नये. तसली क्रांती म्हणजे केवळ ती कल्पनाच पुढे चालू ठेवणे असते. ते आमूलाग्र परिवर्तन किंवा कायापालट नसतो. कल्पनेवर आधारलेल्या क्रांतीमुळे रक्तपात होतो, फाटाफूट व गोंधळ निर्माण होतात. गोंधळातून तुम्ही सुव्यवस्था निर्माण करू शकत नाही. मुद्दाम अराजक निर्माण करून त्या गोंधळातून नंतर व्यवस्था निर्माण करण्याची आशा तुम्ही बाळगूच शकत नाही. जागतिक गोंधळातून व्यवस्था निर्माण करणारे देवाचे लाडके असे तुम्ही कोणी लागून गेले नाहीत. व्यवस्था निर्माण करण्याच्या मिषाने जास्त जास्त गोंधळच निर्माण करणाऱ्या लोकांची ती एक विचारसरणी आहे. त्यांच्या हाती त्या वेळेपुरती सत्ता असते म्हणून त्यांना असे वाटते की सुव्यवस्था आणण्याचे सर्व मार्ग काय ते त्यांनाच फक्त माहीत आहेत. जगातील सर्वत्र ओढवलेली विपन्नावस्था पाहून, सदोदित चालणारी युद्धे पाहून, अखंडपणे चालणारे वर्गकलह व सामाजिक तंटे, भयंकर स्वरूपाची आर्थिक व सामाजिक विषमता, सुखाच्या शिखरावर असणारे, काडीचीही चिंता नसलेले लोक आणि विद्वेष, तंटेबखेडे आणि कमालीची दु:खे यांनी गांजलेले लोक यामधील भयंकर तफावत हे सारे प्रत्यक्ष पाहून, आता संपूर्ण क्रांती झालीच पाहिजे, आमूलाग्र परिवर्तन झालेच पाहिजे, असे नाही का वाटत?

पण हे परिवर्तन, ही आमूलाग्र क्रांती, सरतेशेवटी प्राप्त होणारी आहे की ती क्षणोक्षणी घडणारी आहे? मला माहीत आहे की ही अंतिम प्राप्तव्य आहे, असे म्हणणे तुम्हाला आवडेल, कारण लांबच्या वायद्यांच्या भाषेत बोलणे जास्त सोपे असते. अंती आपले परिवर्तन होईल. सरतेशेवटी आपण सुखी होऊ आणि तोपर्यंत आहे तोच रामरगाडा चालू द्यावा, अशी आपली धारणा असते. पण असे नेहमी भविष्याच्या गोष्टी करणारे मन वर्तमानात प्रत्यक्ष कृती करण्यास असमर्थ असते. म्हणून अशा मनाला खरोखर परिवर्तन नको असते, ते परिवर्तनाची टाळाटाळ करीत असते. परिवर्तन म्हणजे तरी काय?

परिवर्तन भविष्यकाळात नसते. ते भविष्यकाळी कधीही असू शकत नाही. ते फक्त आताच असू शकते. क्षणोक्षणीच घडू शकते. तर मग परिवर्तनाचा अर्थ काय आहे? खरोखरी तो अगदी सोपा आहे. ''असत्य हे असत्य म्हणून ओळखणे व सत्य हे सत्य म्हणून जाणणे, असत्यातील सत्यता पाहणे व जे सत्य म्हणून मान्य केले जाते त्यातील असत्यता पाहणे'' असत्य हे असत्य म्हणून पाहणे, व सत्य हे सत्य म्हणून पाहणे हे परिवर्तन होय. कारण जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीची सत्यता पाहता, तेव्हा ते सत्यच बंधविमोचक असते. जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट असत्य आहे असे स्पष्ट ओळखता तेव्हा ती गोष्ट गळून पडते. पूजाअर्चा, जपजाप्य वगैरे सर्व व्यर्थ पोपटपंची असते असे जेव्हा तुम्हाला स्पष्ट कळून येते, खरोखरच उमजते व त्यांचे तुम्ही समर्थन करीत नाही तेव्हा तेथे परिवर्तन असते, होय की नाही? कारण, आणखी एक बेडी गळून पडलेली असते. वर्गभेद हा एकदम खोटा आहे हे जेव्हा तुम्हाला समजते व वर्गभेदामुळे संघर्ष, कलह, दु:ख, माणसामाणसांत भेद उत्पन्न होतो हे जेव्हा तुम्हाला सत्यत्वाने कळून येते, तेव्हा ते सत्यच तुमचे विमोचन करते. त्या गोष्टीतील सत्यदर्शन होणे हेच मुळी परिवर्तन असते, होय की नाही? आपल्याभोवती पुष्कळशा खोट्या गोष्टीच फैलावलेल्या असल्यामुळे क्षणोक्षणी असत्यतेचे असत्य म्हणून स्पष्ट दर्शन करणे हेच परिवर्तन होय. सत्य हे साचविता येत नाही. ते क्षणोक्षणी असते. जे साठवून ठेवता येते ते म्हणजे स्मरण होय आणि आठवणींच्या द्वारा तुम्हाला सत्य कधीही सापडणार नाही. कारण स्मृती, आठवण म्हणजेच काळ असतो; भूत, भविष्य व वर्तमान अशा भेदांनी मोजला जाणारा काळ असतो. जे सनातन आहे ते काळाच्या द्वारा, सातत्याच्या द्वारा गवसत नाही. सनातनात 'तोच-तो' पणा नसतो- जे विशिष्ट कालावधीपर्यंत चालू राहणारे असते ते म्हणजे सनातन नव्हे. सनातन तर क्षणातच असते. वर्तमानक्षणीच असते आणि हा वर्तमान क्षण म्हणजे गतकाळाचे प्रतिबिंब नव्हे. भूतकाळाची वर्तमानाच्या वाटेने भविष्याकडे सतत होणारी वाटचालही नव्हे.

जे मन भविष्यकाळी परिवर्तन होण्याची इच्छा करते किंवा अंतिम साध्य होणारी अवस्था या दृष्टीने परिवर्तनाकडे पाहाते ते मन सत्यदर्शन कधीच करू शकत नाही. कारण सत्य ही क्षणोक्षणी आविर्भाव होणारी नूतनता आहे. ती नित्य नवेपणाने अनावृत्त होत असली पाहिजे आणि संचयातून नवा शोध कधीही लागत नसतो. तुमच्यावर जुन्याचे ओझे असेल तर तुम्ही नवीनाचा शोध कसा लावणार? ते ओझे टाकून दिले तरच तुम्हाला नवीन काय ते सापडते. नित्यनूतन सनातन तत्त्वाचा वर्तमानात क्षणोक्षणी प्रत्यय येण्यासाठी मन अत्यंत दक्ष असले पाहिजे. मनात फलप्राप्तीची इच्छा किंवा आपण कोणीतरी व्हावे ही आकांक्षा असता कामा नये. जे मन 'कोणीतरी, काहीतरी' बनत असते, त्याला संतोषातील सुख कधीच अनुभवता येत नाही. हा संतोष म्हणजे केवळ ऐहिकातील समाधान नव्हे. मनोरथपूर्तीतील तृप्ती नव्हे, तर जेव्हा मनाला 'जे आहे' त्यातील सत्यता व 'जे आहे' त्यातील असत्यता स्पष्ट दिसत असते, तेव्हाच हा संतोष उदयास येतो. त्या सत्याचे दर्शन क्षणोक्षणी घडत असते आणि त्या क्षणाचे शब्दांत वर्णन केले तर त्या दर्शनाला विलंब होतो.

परिवर्तन हे ध्येय नव्हे, अंतिम साध्य नव्हे. परिवर्तन हे फल नव्हे. फल म्हटले की त्यात अवशेष अध्याहृत असतो, कारण आणि परिणाम गृहीत असतो. 'कारण' असते तेथे 'कार्य' असणारच. पण कार्य, परिणाम, फल म्हणजे परिवर्तन होण्याच्या तुमच्या आकांक्षेचाच एक परिणाम असतो. परिवर्तन होण्याची इच्छा तुम्ही धरता तेव्हाही तुम्ही 'स्वत: कोणीतरी व्हावे' या भाषेतच विचार करीत असता. पण जे काही होत असते, बनत असते, त्याला जे फक्त असणे असते, अशा 'सत्' अवस्थेचे आकलन होणे शक्य नसते. सत्य हे क्षणोक्षणीचे असणे होय आणि ज्या सौख्याला सातत्य असते, ते सौख्य नव्हेच. सौख्य ही अस्तित्वाची कालातीत अवस्था असते. ज्या वेळी प्रचंड असंतोष असतो तेव्हाच ती कालनिरपेक्ष अवस्था अस्तित्वात येऊ शकते. कोणतीतरी पळवाट सापडून, त्यातून समाधान पावणारा हा असंतोष नसतो, तर असा असंतोष जो कोठेही वाहून जाऊ शकत नाही, ज्याला कोणतीही समाधानाची पळवाट नाही, ज्याला इच्छापूर्तीची अपेक्षाच नाही. फक्त अशाच आत्यंतिक असंतोषाच्या अवस्थेत सत्याचा

अविर्भाव होत असतो. ते सत्य विकत घेता येत नाही किंवा विकताही येत नाही. त्याचा जप करता येत नाही. ते पुस्तकात बांधून ठेवता येत नाही. तर एखाद्या स्मितहास्यातून, एखाद्या अश्रूतून, एखाद्या पिकलेल्या पानातून, भटकत जाणाऱ्या विचारात किंवा प्रीतीच्या पूर्णतेतून ते क्षणोक्षणी प्रतीत व्हावे लागते.

प्रीती ही सत्यापेक्षा वेगळी नसते. प्रीतीच्या अवस्थेत कालरूपी विचारांची हालचाल पूर्णपणे विराम पावलेली असते. जेथे प्रीती असते तेथेच पूर्ण परिवर्तन असते, कायाकल्प असतो आणि प्रीतीशून्य क्रांती फोल आहे. तशा क्रांतीत अपक्षय व विनाशच असतो, सतत वाढत जाणारे दुःखच असते. जेथे प्रीती असते तेथेच संपूर्ण क्रांती असते; कारण प्रीती म्हणजेच क्षणोक्षणीचे पूर्ण परिवर्तन होय, पूर्ण रूपांतर होय.

प्रथम अर्थात अंतिम मुक्ती
प्रकरण : ३८ - 'परिवर्तनाविषयी'

# परीक्षण

## 'परिवर्तनाचे आव्हान'

जे. कृष्णमूर्तींवरील 'द चॅलेंज ऑफ चेंज' ('The Challenge of Change') हा चरित्रात्मक माहितीपट ते हयात असताना कृष्णमूर्ती फाऊंडेशन ऑफ अमेरिका या संस्थेद्वारा निर्माण केला गेला. मायकेल मेंडिझा यांनी दिग्दर्शित केलेल्या या माहितीपटाचे मराठी संस्करण (डबिंग) फाउंडेशनच्या मुंबई केंद्रातर्फे करण्यात आले आहे. कृष्णमूर्तींच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या जडणघडणीची, त्यांच्या तेजस्वी तत्त्वज्ञानाची आणि नाट्यमय जीवनाची माहिती देणारा हा चित्रपट म्हणजे मराठी अभ्यासकांना एक पर्वणीच आहे.

या माहितीपटाला साधारण १८८१ पासून ते १९८३ पर्यंतचा विस्तृत कालखंड पार्श्वभूमी म्हणून लाभला आहे. चित्रपट सुरू होतो ते कृष्णमूर्तींच्या काही विलक्षण सत्यदर्शी वाक्यांनी! विचार कसा स्वभावत: पवित्र नसतो हे त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत पटवून दिले आहे, आणि मग प्रश्न केला आहे 'पवित्र काय आहे?' या भेदक प्रश्नाचे तितकेच तर्कसंगत उत्तरही दिले आहे. अशा जोरकस सुरूवातीनंतरच प्रेक्षकांच्या लक्षात येते की, पुढे आपण जे बघणार आहोत ते काहीतरी वेगळे आणि विलक्षण आहे. आणि मग, आपण एका निरागस बालकाच्या दैवतीकरणापासून ते अत्यंत मूलगामी तत्त्वज्ञान मांडणाऱ्या अलौकिक सत्यदर्शीचा जीवनप्रवास विस्मयाने बघत, खिळून जातो.


यात दाखविण्यात आलेली कृष्णमूर्तींची युरोप, अमेरिका आणि भारतातील व्याख्याने आणि विद्यार्थ्यांशी त्यांनी केलेला संवाद यातून श्रोत्यांना कृष्णमूर्तींचे तत्त्वज्ञान आणि दृष्टिकोन यांची ओळख होते. यातील काही विषय म्हणजे परिवर्तनाची गरज, सुव्यवस्था, मुक्ती, नातेसंबंध आणि प्रतिमा, धर्म, ध्यान, प्रेम आणि सरतेशेवटी जीवन. या सर्व विषयांवरची भाष्ये अतिशय मर्मग्राही आहेत.


या माहितीपटात १९६० पर्यंतचा काळ केवळ छायाचित्रांतून आणि चलत्‌चित्रफिती वापरून तयार करण्यात आला आहे. मायकेल रॉजर्स यांनी दिलेले संगीत सुश्राव्य आहे. कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानाचा अनुवाद करण्याचे आव्हान अजित केळकरांनी समर्थपणे पेलले आहे. डबिंग करताना कृष्णमूर्तींचा आवाज प्रेक्षकांना ऐकू येईल असा ठेवल्याने, या माहितीपटाला विश्वासार्हता प्राप्त झाली आहे.

थोडक्यात, 'परिवर्तनाचे आव्हान' हा माहितीपट प्रभावी तर आहेच पण अभ्यासकांसाठी संग्रही ठेवण्यासारखाही आहे.

ह्या माहितीपटाचे गुजराथी संस्करण 'परिवर्तननो पडकार' या नावाने उपलब्ध आहे.

या माहितीपटाच्या, रु. २०० किंमत असलेल्या, डिव्हिडीज्‌ संस्थेच्या सह्याद्री आणि मुंबई केंद्रात उपलब्ध आहेत.




## चार पुस्तिका

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, चेन्नई यांनी कृष्णजींच्या काही निवडक आणि महत्वाच्या इंग्रजी भाषणांची ९ पॉकेटबुक्स्‌ काढलेली आहेत. ह्या पॉकेट बुक्सपैकी चार पुस्तिकांचे अलिकडेच कल्याणी किशोर यांनी अगदी नेटक्या आणि समर्पक शब्दात भाषांतर करून मराठी वाचकांची सोय केली आहे. खरे तर, जिज्ञासू व गंभीर अभ्यासकांसाठी ही फार मोलाची भेट आहे.

कृष्णजी त्यांच्या भाषणांतून आत्मज्ञानाचा वारंवार उल्लेख करतात. त्या संदर्भात 'आत्मबोध म्हणजे काय?' ही पुस्तिका आपल्याला अंतर्मुख व्हायला लावते. तशाच इतर तीन पुस्तिका: 'दुःखाचा अंत', 'मृत्युबरोबर जगणे' आणि 'संघर्षमुक्त जीवन'. या चारही पुस्तिका जर आपण तन्मयतेने वाचल्या तर दैनंदिन जीवन जगताना येणाऱ्या अनुभवांना, जाणीवांना त्या आत कुठेतरी स्पर्श करतात आणि कृष्णजींच्या शिकवणुकीचा गाभा समजून घेण्यास मदत करतात.

प्रत्येकी २५ रुपये किंमत असलेल्या या पुस्तिका संस्थेच्या सह्याद्री आणि मुंबई केंद्रात उपलब्ध आहेत.

# सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मधील कृष्णमूर्तींवरील कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





कृष्णमूर्ती जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌च्या निसर्गरम्य परिसरात सतत ३० वर्षे झाडे, वेली, पक्षी ह्यांच्या सोबतीने मुंबईकरांशी संवाद साधत असत. तेथील विद्यार्थ्यांच्या यंदाच्या वार्षिक आनंद उत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये फाउंडेशनचे मुंबई केंद्र सहभागी झाले. २३ ते २६ फेब्रुवारीपर्यंत तेथे कृष्णमूर्तींच्या पुस्तकांची आणि ऑडिओ, व्हिडिओ सीडीज्‌ची विक्री आयोजित करण्यात आली होती.

मुलांमध्ये आणि शिक्षक, पालकांमध्ये कृष्णमूर्तींविषयी थोडी उत्सुकता निर्माण झालेली दिसत होती. कृष्णमूर्ती जिथे बसून व्याख्यान देत असत, त्या लाल कट्ट्यावर विद्यार्थ्यांनी कृष्णमूर्तींची छायाचित्रे आणि त्यांच्या भाषणातील अवतरणे कलात्मकरित्या सादर केली होती.

शेवटच्या दिवशी कृष्णमूर्तींच्या जीवनावर आधारित जी. अरविंदन् ह्या समर्थ कलादिग्दर्शकांकडून फिल्म्स् डिव्हिजनने मुद्दाम तयार करून घेतलेली एक चित्रफीत 'द सिअर हू वॉक्स् अलोन' ('The Seer Who Walks Alone') दाखवायचे ठरले आणि १९८५ नंतर कृष्णमूर्तींचा आवाज तेथे पुन्हा एकदा घुमला.

फिल्म दाखविण्याआधी प्रस्तावना म्हणून चार शब्द सांगितले गेले. हा ऋषितुल्य माणूस ह्या पृथ्वीतलावर एकटा चालला म्हणजे काय? अफाट संपत्ती, हजारो शिष्यगण आणि प्रचंड अपेक्षांचे केंद्रबिंदू अशा स्थितीत असताना, एका मोठ्या जनसमुहासमोर संस्कारित मार्गाशी आपला संबंध संपवून उर्वरित आयुष्य मानवजातीच्या संपूर्ण परिवर्तनासाठी कृष्णमूर्ती प्रवास करीत राहिले. ज्या तळमळीने ते बोलले त्या तळमळीच्या जवळपास कोणी पोहोचले असेल की नाही हे माहीत नाही. त्या दृष्टीने पाहता त्यांचा प्रवास एकट्याचा होता.

आणखी एक गोष्ट विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न झाला; ती अशी - आर्टस् स्कूल विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन होते. अत्यंत सुंदर कलाकृती, प्रत्येक गोष्टीमध्ये मुलांच्या सृजनशक्तीची साक्ष होती. बघितलेल्या गोष्टींकडे डोळे परत ओढत होते. इतक्या सुंदर गोष्टींचे वर्णन करायला ही जागा अपुरी आहे. परंतु ह्या सौंदर्याला बक्षिसांचे गालबोट होते, तुलनेचे ग्रहण होते. सौंदर्य निर्माण होत असताना तुलनेची भावना असली तर ते सौंदर्य संपूर्ण नसेल आणि सौंदर्य निर्मितीचा आनंद निरागस नसेल. तुलनेपासून मुक्त मन सृजनशक्तीला बहरण्यास मुक्त वाट देऊ शकते हे सांगण्याचा प्रयत्न केला गेला. सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आणि त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रतिसाद ही अपेक्षा नसली तरी संदेश पोहोचल्याचे समाधान होते.

फिल्ममध्ये कृष्णमूर्तींच्या जे. जे. स्कूलमध्ये झालेल्या भाषणांचे बरेचसे चित्रिकरण दाखविले आहे. चित्रपट संपताना कृष्णमूर्तींच्या तेथील शेवटच्या भाषणाचे अतिशय सुंदर दृश्य पडद्यावर येते - कृष्णमूर्ती छोट्याशा व्यासपीठावर बसले आहेत आणि समोर मोठ्या संख्येने प्रेक्षक अतिशय शांततेने ऐकत बसलेले आहेत. जीवनाबद्दल संपूर्णपणे नवी दृष्टी देणाऱ्या एका आधुनिक संताचे बोल ऐकणे म्हणजे काय असेल ह्याची अनुभूती होते.



सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये कृष्णमूर्ती - १९८५

# नकारात्मकता हे ध्यानावस्थेचे उच्च स्वरूप आहे

प्रश्नकर्ता:- परिवर्तन हे कृतीच्या पातळीवर नसते.

कृष्णमूर्ती:- का? तत्काळ परिवर्तनाचे महत्त्व मला काळाच्या भाषेत नव्हे, तर विचाराचे संपूर्ण नवजीवन, स्पष्टता व सृजनशीलता ह्यांच्या संदर्भात दिसून येते. मी स्वत:ला यातनांमध्ये पहातो. मला हे परिवर्तन सापडले तर माझ्या जीवनाला अर्थ लाभेल. म्हणून मग मी कोणती गोष्ट परिवर्तनाकडे नेईल आणि कोणती विचलित करील ह्याचा शोध घेत लांबवर प्रवास करतो. ते समजून घेतो. माझा हा निश्चित उद्देश असतो आणि मी सरळ पुढे जात असतो.

एक उदाहरण देऊन हे स्पष्ट करता येईल. समजा मी एका संपूर्ण तटबंद किल्ल्यामध्ये राहतो आहे, आणि कोणीतरी म्हणते की, ह्या किल्ल्याच्या तटापलिकडे काहीतरी विलक्षण आश्चर्यजनक आहे. मला जर तटापलिकडचे पहायचे असेल आणि त्या संबंधीची माझी कोणतीही कृती जर केवळ किल्ल्याच्या परिसीमेतच मर्यादित असेल तर ती फोल आहे. जर ती भिंत मी तोडली तरच मला बाहेर काय आहे ते दिसेल.

जेव्हा तुम्हाला एखाद्या गोष्टीचा - एखादे मूल किंवा एखादे चित्र वगैरेचा बोध करून घ्यायचा असेल तेव्हा ते पाहण्यासाठी, अभ्यासण्यासाठी तुम्हाला स्तब्ध असावे लागते. तुमची कृती सदैव शांतपणे पाहण्याची, निरीक्षण करण्याची आणि अभ्यासण्याची असायला हवी. जेव्हा तुम्हाला कळते की, तुम्ही काहीही केले तरी तुमच्यात परिवर्तन होणार नाही तेव्हा तुमच्या कृतीचे काय होते? जेव्हा तुमच्या सर्व कृतींची निष्फळता तुम्हाला कळते तेव्हा तुम्ही काय करता? तुम्ही प्रयत्न करून संगीत ऐकू शकता का? संगीताचा आनंद घेण्यासाठी तुम्हाला अगदी शांत बसायला नको का? तसेच, आपण काही करायला पाहिजे ही भावना जेव्हा निर्माण होते तेव्हा हेच दर्शविते की तुम्ही काहीही केलेत तरी कुठल्याही प्रकारचे परिवर्तन होणार नाही हे तुम्हाला अजून स्पष्ट कळलेलेच नाही.

प्रश्न:- इच्छा ही परिवर्तनाच्या आड येते का?

कृष्णमूर्ती:- नाही का? ह्याचा तुम्ही स्वत:च का शोध घेत नाही? परिवर्तनाच्या बाबतीत हा शोध घेणे बऱ्यापैकी सोपे आहे.

प्रश्न:- मी काहीच केले नाही तर परिवर्तन होणार नाही.

कृष्णमूर्ती:- तुम्हाला कसे माहीत असणार? तुम्हाला स्पष्ट कळतंय की परिवर्तन आवश्यक आहे, तुम्हाला त्याची गरज भासते आहे. जेव्हा तुम्हाला समजते की, तुम्ही ह्या बाबतीत काही करू शकत नाही, तेव्हाच तुम्ही काहीही न करता शांत बसता. तुम्हाला माहीत आहे की, विचारांची प्रक्रिया तुम्हाला परिवर्तनाकडे नेणार नाही. स्मृती ही नेहमी विचारांना चालना देते आणि स्मृती ही अपूर्ण अनुभव आहे. इच्छा ही देखील विचारांची प्रक्रिया आहे. मायलापूरला जाणारा रस्ता ही वस्तुस्थितीशी निगडीत स्मृती आहे. जेव्हा त्या रस्त्यावरून चालणारे लोक तुम्हाला अपुरा अनुभव देतात तेव्हा ती स्मृती मानसिक होते. तुमचे आयुष्य अर्धवट अनुभवांनी बनलेले आहे. ते अनुभव पूर्ण होईपर्यंत तुम्हाला कृती करण्याशिवाय गत्यंतर नाही. तुम्हाला असंख्य स्मृती आहेत आणि तुमचे मन मुक्त होईस्तव तुम्ही त्या स्मृतींना धुवून घालविल्या पाहिजेत. हे शक्य आहे का? नाही. तुम्ही संपूर्ण भूतकाळ साफ करू शकत नाही. तुमच्या कृतीतून तुम्ही तुमच्या जाणिवेत समाविष्ट असलेल्या सर्व गोष्टींचा तपास करून, त्या संपवू शकाल का? त्याला वेळ लागेल; तुमच्या चौकशीचे साधन अपूर्ण आहे. काही गोष्टी तुमच्याकडून सटकतील म्हणून तुमच्या ह्या भूतकालीन अनुभवांच्या परीक्षणात तुम्ही नक्कीच परत अडकले जाणार. तर मग तुम्हाला काय करायला हवे?

प्रश्न :- बाहेर पहा आणि नवीन अनुभवाशी गाठ पडते तेव्हा तुमचे काय होते ते पहा.

कृष्णमूर्ती:- हे तुम्ही तुमच्या प्रत्येक अनुभवाबरोबर करू शकाल का? आणि जरी तुम्ही केले तरी त्याला किती काळ लागेल? आणि परत, जाणीवेच्या लपलेल्या स्तरावर येणाऱ्या सूचना सुद्धा समजल्या गेल्या पाहिजेत आणि त्याच्यावर काम केले गेले पाहिजे. म्हणून तुम्ही हे करू शकणार नाही.

प्रश्न :- जेव्हा तुम्हाला ते करता येत नाही तेव्हा तुम्ही काय करू शकता? तुम्हाला एकतर बाहेर पडायला पाहिजे किंवा स्विकारायला पाहिजे.

कृष्णमूर्ती:- तुम्ही अशा अवस्थेत आहात का की काय करावे ते तुम्हाला माहीत नाही? जेव्हा, तुम्ही तुम्हाला माहीत नाही असे म्हणता, त्यामागे काय असते?

प्रश्न :- तेच मला जाणून घ्यायचे आहे.

कृष्णमूर्ती:- जेव्हा तुम्हाला कळते की तुम्ही काहीही केले तरी ते परिवर्तनाकडे नेणार नाही तेव्हा तुम्हाला काय करायला हवे? काय करायला हवे हे समजण्यासाठी 'काय करायचे हे मला माहीत नाही' हे तुम्हाला समजले पाहिजे. जेव्हा तुम्ही म्हणता 'मला माहीत नाही' तेव्हा तुम्ही एका नव्या स्थितीत जाता - त्या संबंधात तुम्ही काहीही नसता.

प्रश्नकर्ता:- ह्यात 'हे समजणे शक्य आहे' ह्याची दखल नाही का?

कृष्णमूर्ती:- मी काहीही केले तरी भूतकाळापासून सुटका करू शकत नाही. मग मी काय करू? मला त्याबद्दल काहीतरी करायचंय आणि मी काहीही करू शकत नाही. म्हणून मला भूतकाळ किंवा भविष्यकाळाबद्दल काय करावे हे माहीत नाही. हे कळल्यानंतर जेव्हा मी म्हणतो, 'मला माहीत नाही' तेव्हा माझे मन अत्यंत दक्ष, अत्यंत शांत आणि एका नव्या अवस्थेत असते.

प्रश्नकर्ता:- ही अपेक्षेची अवस्था असते.

कृष्णमूर्ती :- जेव्हा तुम्ही अपेक्षा करता तेव्हा ती ज्ञानावर आधारित असते. म्हणून त्याबद्दल आपण काही करू शकत नाही, हे त्या मनाला अजून कळलेले नसते. परंतु, जर तुम्हाला प्रत्यक्ष कळले आणि तुम्ही म्हणालात की मला माहीत नाही तर तुमचे मन विलक्षण दक्ष असते; 'मी हा आहे' असे जेव्हा होकारार्थी म्हणता त्यापेक्षा अधिक दक्ष असते. ह्याचा अर्थ नकारात्मकता हे ध्यानावस्थेचे उच्च स्वरूप आहे; हे विचाराचे पूर्ण संपुष्टात येणे आहे. म्हणून 'न समजणेपणा' ही, जिच्यामध्ये भूतकाळ संपलेला आहे अशी मनाची नवी अवस्था आहे. दुर्दैवाने तुम्ही तुमच्या मनाला त्या अवस्थेपर्यंत पोचू देत नाही, तुमचे मन तुम्हाला त्या टप्प्यापर्यंत जाऊ देत नाही. अशा प्रकारे मन त्याच्या सर्व भूतकाळापासून तत्काळ साफ होऊ शकेल, जाणिवेत समाविष्ट असलेले सर्व धुवून जाऊ शकेल असा मार्ग आहे. जेव्हा मन त्याच्या भूतकाळापासून असे पूर्णपणे धुवून निघेल, तेव्हा तिथे प्रत्यक्ष कृती असेल.

जोपर्यंत अशी स्थिती, जिच्यामध्ये तुमच्या संपूर्ण अस्तित्वासह तुम्हाला प्रत्यक्ष कळते आणि तुम्ही म्हणता, 'मला माहीत नाही' - अशी स्थिती असत नाही, तोपर्यंत तुम्ही विचारांची प्रक्रिया थांबवू शकत नाही, म्हणजेच - अनुभवाची प्रक्रिया (आकलन, संबंध, संवेदना, इच्छा, सरूपता), नाव देण्याची प्रक्रिया (सुख किंवा दु:ख), नोंद करण्याची प्रक्रिया (स्मृती आणि मन).

प्रश्न :- जोपर्यंत मी 'मला माहीत नाही' असे

म्हणत नाही तोपर्यंत मी भूतकाळापासून मुक्त नाही. बरोबर?

कृष्णमूर्ती:- मग आत्ताच का म्हणत नाही की मला माहीत नाही? तत्काळ आंतरिक परिवर्तनाविषयी तर आपण सारखी चर्चा करीत आहोत. स्वत:मध्ये परिवर्तन आणण्यासाठी काय करायचे हे तुम्हाला माहीत आहे का? कृपया त्याबद्दल प्रयोग करा तुम्ही माझ्यासाठी एखादी भेट आणता आणि ती मला नको असते तेव्हा ती माझी नसते. तसेच तुम्हाला जेव्हा समस्या असते आणि तुम्हाला कळून चुकते की त्याबद्दल तुम्हाला काहीही माहीत नाही, तेव्हा ती समस्या तुमची नसते.

प्रश्नकर्ता :- मला मानसिक भीतीपासून मुक्त होता येत नाही.

कृष्णमूर्ती :- आता आधीच उशीर झालाय तेव्हा आपण परत भेटू तेव्हा मी त्याकडे लक्ष देईन.

'मला माहीत नाही' असे म्हणणे तुम्हाला का कठीण जातंय? एखादा तंत्रज्ञ म्हणून काम करणे किंवा वकील म्हणून पैसा कमावणे ह्यापलिकडे तुम्हाला काय माहीत आहे? तंत्रज्ञान, दुसऱ्या लोकांकडची माहिती गोळा करणे ह्यापलिकडे तुम्हाला दुसरे काय माहीत आहे? तुम्ही स्मृतींचे एक गाठोडे आहात. त्यापलिकडे तुम्ही काय आहात?

प्रश्न :- मला माहीत नाही.

कृष्णमूर्ती:- पदवी, घर, पैसा हे सर्व काढून घ्या, मग तुम्ही काय आहात? 'मला माहीत नाही', 'मी कोणी नाही' असे तुम्ही का म्हणत नाही? तुम्हाला काहीच माहीत नाही. तुमची सर्व स्वप्नेसुद्धा स्मृतीच्या क्षेत्रात असतात, म्हणून तुम्हाला काही माहीत नाही. तुम्ही हे सत्य का स्वीकारत नाही? ह्या संपूर्ण अभावाला का सामोरे जात नाही, आणि त्याला तोंड देत असताना 'मला माहीत नाही' असे का म्हणत नाही? सर्व संपूर्ण उतरवून मोकळे होऊन म्हणा 'मी कोणी नाही', 'मी काहीही नाही' हे सत्य ओळखणे आहे. तुम्ही त्याकडे कधीही पाहिले नाही, म्हणून तुम्ही त्याला कधी तोंड देत नाही. जेव्हा तुम्ही सामोरे जाण्याच्या अवस्थेत असता आणि स्वत: 'जे आहात' ते सत्य ओळखता तेव्हा तुम्ही म्हणू शकता 'मला माहीत नाही, मी काहीही नाही.' तत्काळ मनातील भूतकाळ संपूर्ण धुवून काढायचा आणि म्हणून तत्क्षणी नवजीवन घडवून आणण्याचा मार्ग आहे. हे तेव्हाच घडते जेव्हा तुम्हाला खरोखर कळतंय आणि तुम्ही म्हणता 'मला माहीत नाही', तेव्हा मनावरील ओझे उतरते आणि ते चपळ, विद्वान, हुशार आणि माहितीपूर्ण नव्हे तर शांत, स्तब्ध आणि विलक्षण दक्ष असते. तेव्हाच फक्त संपूर्ण आणि थेट क्रिया असते.

मद्रास - पाचवी सामुदायिक चर्चा,
२० एप्रिल १९४८

**मराठी शिबिर**

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या सह्याद्री अध्ययन केंद्रातर्फे जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणीसंबंधी एक **मराठी शिबिर** २२ ते २७ मे दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचा विषय आहे : 'परिवर्तनशील ध्यान'. कृष्णमूर्तींचे सर्व अभ्यासक या शिबिरात निमंत्रित आहेत.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री (KFI) येथील विशेष अध्ययन कार्यशाळा**

| | | | |
|---|---|---|---|
| १८ ते २४ जून २००८ | 'What is Krishnamurti's Teaching ? ' | ७ ते ११ जुलै २००८ | 'Love is a Flame without Smoke' |
| ४ ते ८ ऑगस्ट २००८ | 'Relationship is a Movement in Action with Another Human Being.' | ११ ते १७ सप्टेंबर २००८ | 'Meditation is the Way of Total Transformation' |

संपर्क आणि इतर माहितीसाठी केंद्रासंबंधीचे सदर पाहावे.

**आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर येथील विशेष अध्ययन कार्यशाळा**

| | | | |
|---|---|---|---|
| १४ - १५ जून २००८ | 'Meditation' | १२ - १३ जुलै २००८ | 'What is Creation, The Origin, The Beginning ?' |
| ९ - १० ऑगस्ट २००८ | 'Freedom from the Self' | १३ - १४ सप्टेंबर २००८ | 'Problems of Living' |

संपर्क आणि इतर माहितीसाठी केंद्रासंबंधीचे सदर पाहावे.

**श्रद्धांजली..** जे. कृष्णमूर्ती परिवारातील एक ज्येष्ठ मित्र आणि मार्गदर्शक श्री. हमीरभाई विसनजी ह्यांचे अल्पशा आजाराने २४ जानेवारी २००८ रोजी मुंबई येथे दु:खद निधन झाले. हमीरभाई हे मुंबई केंद्राचे बरीच वर्षे आधारस्तंभ होते. कृष्णमूर्ती परिवाराच्या सर्व उपक्रमांमध्ये हमीरभाईंची उणीव सदैव भासत राहील. आज अंतरलहरीच्या प्रकाशनसमयी त्यांची तीव्रतेने आठवण होते आहे. हमीरभाईंना अंतरलहरीची भावपूर्ण श्रद्धांजली. ❄❄❄

## आनंद-विहार अध्ययन केंद्रासंबंधी



जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, मुंबई या संस्थेने मुंबईजवळ ६० कि.मि. अंतरावर बदलापूरजवळ 'आनंद-विहार' हे अध्ययन केंद्र सुरु केले आहे. त्याला आता तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. हे अभ्यासकेंद्र शहरी गजबजाटापासून दूर असून पूर्णतः शांत अशा ठिकाणी निसर्गाच्या कोंदणात वसलेले आहे. येथे राहण्या जेवण्याची सोय असून जे. कृष्णमूर्ती यांची सर्व पुस्तके इ. उपलब्ध असलेली लायब्ररी आहे. मुंबईच्या धावपळीच्या जीवनापासून थोडेसे दूर जाऊन स्वतःचा शोध घेऊ इच्छिणाऱ्या अभ्यासकांना हे अभ्यासकेंद्र निश्चितच पोषक ठरू शकेल.

इथे दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी, रविवारी अभ्यासक एकत्र येतात आणि कृष्णमूर्तींच्या शिकवणीमधून एखादा विषय घेऊन त्यावर संवाद केला जातो.

संपर्कासाठी पत्ता :- आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर,
राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र
दूरध्वनी : ९८२२३४७४५४, (०२२) २५१५३०९४ • ई मेल : zilog@vsnl.com

## शांत आणि निश्चल मनच परिवर्तन घडवून आणू शकते

कोणती गोष्ट, कोणतीही मानवी किंवा शास्त्रीय समस्या आकलन होण्यासाठी काय आवश्यक असते? त्यासाठी मन शांत व जिज्ञासू हवे. नाही का? ते मन कोणत्याही गोष्टीला वगळणारे व एकाच ठिकाणी केंद्रित होणारे नसते, तसे करणे हा सुद्धा एक प्रकारचा प्रतिकारच असतो. मला जर खरोखर काही समजून घ्यायचे असेल तर मन लगेच अगदी शांत होते. तुम्हाला आवडते संगीत ऐकायचे असले किंवा तुम्हाला प्रिय असणारे, मुग्ध करणारे चित्र अवलोकन करायचे असले तर तेव्हा तुमच्या मनाची स्थिती कशी असते? तत्काळ एक प्रकारची शांती असते, होय की नाही? ते संगीत ऐकताना तुमचे मन सगळीकडे भटकत नाही; त्यावेळी तुम्ही श्रवणमग्न असता. तसेच तुम्हाला संघर्षाचे आकलन व्हावेसे वाटत असते तेव्हा काळावर अवलंबून असता उपयोगी नाही. जे आहे त्याच्या, म्हणजे संघर्षाच्या सन्मुख तुम्ही असता, बस्स्. त्यावेळी मन एकदम स्तब्ध असते. जे आहे त्यात पालट घडविण्यासाठी काळाचा उपयोग करणे फोल आहे हे तुमच्या लक्षात येऊन तुम्ही जेव्हा काळाचे साधन वापरत नाही तेव्हा तुम्ही 'जे आहे' त्याच्या प्रत्यक्ष समोर येता, आणि जे आहे त्याचेच आकलन करण्याची तुम्हाला जिज्ञासा असल्यामुळे तुमचे मन शांत असते. त्या दक्ष परंतु स्वस्थ, शांत अवस्थेत बोधाचा उदय होतो. पण जोपर्यंत मन प्रतिकार करते, संघर्षात असते. धिक्कार करीत असते, तोपर्यंत बोधाचा उदय होत नाही. जर मी तुम्हाला समजून घेऊ इच्छित असलो तर मी तुमच्यावर दोषारोप करून चालणार नाही, हे उघड आहे, तेव्हा, शांत आणि निश्चल मनच परिवर्तन घडवून आणू शकते. मन जेव्हा, जे वास्तव आहे त्याला प्रतिकार करीनासे होते, त्याची टाळाटाळ करीत नाही किंवा त्याला बाजूला सारीत नाही, दोष देत नाही, तर त्या वास्तवाचे अक्रियपणे भान ठेवते, तेव्हा मनाच्या या अक्रियतेतूनच परिवर्तन होते, असे तुम्ही त्या प्रश्नात खरोखर शिरलात, तर तुम्हाला आढळेल.

- प्रथम अर्थात अंतिम मुक्ती
प्रकरण २०- 'काळ आणि परिवर्तन'

**जे.** कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

शिक्षण, संशोधन, सांस्कृतिक आणि पर्यावरणविषयक निरनिराळे उपक्रम संस्था राबवत असते. कृष्णजींची पुस्तके, या पुस्तकांची भाषांतरे, डिव्हीडीज् इ. सर्वांसाठी उपलब्ध करून त्यांचे वितरण करण्याचे काम या संस्थेमार्फत केले जाते.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

फाउंडेशनच्या इतर शाखा व कार्यशाळांविषयी माहितीसाठी वरील पत्त्यावर संपर्क साधावा.

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस् :**

http://jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

कृष्णमूर्ती फाऊंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत. बाल आनंद हे बालविकास केंद्रही मुंबई केंद्राशी संबद्ध आहे.

केंद्रातर्फे वेळोवेळी कृष्णमूर्तींच्या शिकवणीच्या अनुषंगाने जीवनाचा सखोल अभ्यास करणाऱ्या विचारवंतांची भाषणे आयोजित करण्यात येतात. दर शनिवारी, रविवारी कृष्णजींची भाषणे व संवादांचे व्हिडिओ येथे दाखविले जातात. तसेच दर गुरूवारी संवाद गटाचे आयोजन होते.

सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी व्हिडिओ आणि त्यानंतर येणाऱ्या सोमवारी त्यावर संवाद आयोजित केले जातात. मुंबईतील इतर महाविद्यालये आणि शाळांमधून विद्यार्थी आणि शिक्षकांबरोबर संवाद साधण्यातही संस्था कार्यरत आहे.

**संपर्क** :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४०००००६.
दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

Published in January, May, September Periodical

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*